स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

-:संशोधन विषय:-

“मराठवाड्यातील आदिवासी आंध जमातीच्या लोकगीतातील समाजदर्शन : एक विवेचक अभ्यास"

-:संशोधक:-

श्री.ज्ञानेश्वर नगाजी भडंगे

(एम.ए.सेट मराठी)

-:मार्गदर्शक:-

प्रा.डॉ. राजेश श्रीराम धनजकर

{ एम.ए.,बी.एड.,सेट.पीएच.डी.(मराठी),एम.ए.(इति),एम. ए.(राज्य), }

मराठी विभाग

श्री. संत जनाबाई शिक्षण संस्थेचे,

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

गंगाखेड ता. गंगाखेड जि. परभणी

मार्च - २०२४

1) प्रास्ताविक:-

आपला भारत देश हा विविधतेत एकता असलेला एकमेव देश आहे. भारतात अनेक जाती धर्माच्या लोकांचे वास्तव्य आहे. समृद्धीने नटलेल्या या देशात वेगवेगळ्या राज्यांची वेगवेगळी बोली, वेगवेगळ्या संस्कृती आणि रूढी परंपरेने आपापले जीवन जगणारे जनजीवन पहावयास मिळते. त्याचप्रमाणे महाराष्ट्र; 'म्हणजे महान असे राष्ट्र' ज्याप्रमाणे भारत हा विविधता असलेला देश आहे; त्याचप्रमाणे महाराष्ट्र हे विविधतेतून नटलेले समृद्ध असे राज्य आहे. अनेक जाती-धर्माच्या लोकांची निरनिराळी संस्कृती, चाली-रिती, रूढी-परंपरा, त्यांचा पेहराव, राहणीमान, बोलीभाषा आणि शारीरिक विविधता आढळून येते.

अतिप्राचीन काळापासून या देशाच्या या राज्याच्या कर्मभूमिवर अधिराज्य गाजवणारी आणि आपले अस्तित्व टिकविण्यासाठी वास्तव्य करून असलेली एक जमात म्हणजे 'आदिवासी' जमात होय. आदिवासी हा या देशाचा मूळ मालक आहे. निसर्गाचा समतोल हा फक्त आणि फक्त आदिवासीच राखू शकतो. आदिवासी जमातीच्या रूढी, परंपरा आणि चालीरिती इतर धर्माच्या लोकांपेक्षा काही वेगळ्याच आहेत. खरं तर आदिवासींना कोणताच धर्म नाही. आदिवासी हा निसर्ग पूजक आहे. आदिवासींची निसर्गाशी जोडलेली नाळ ही अतूट आहे. निसर्ग आणि आदिवासी यांचे एक अतूट नाते संबंध आहेत.

खऱ्या अर्थाने जल, जंगल आणि जमिनीचा खरा मालक हा आदिवासीच आहे. आदिवासी समाज हा अतिप्राचीन मूळ भारतीय समाज आहे. एकेकाळी भारतीय वनसंपत्तीचा मालक असणारा हा समाज इंग्रजांच्या आणि प्रस्थापित स्वतःला पुढारलेले आणि श्रेष्ठ समजणाऱ्या प्रस्थापित लोकांच्या आर्थिक शोषणामुळे, आर्थिकदृष्ट्या दुर्बल बनत गेला. आदिवासी म्हणजे अधिक काळापासून वास्तव्याला असणारा समूह होय. त्यांच्या दैनंदिन जीवनाचे इतर समाजाशी काही देणे घेणे नाही. आदिवासींचे देव, भाषा आणि चालीरिती अन्य ग्रामीण आणि शहरी लोकांपेक्षा भिन्न आहेत.

भारतीय राज्यघटनेत अशा आदिवासींचा समावेश अनुसूचित जमातीमध्ये केला आहे. भारतात ९ ऑगस्ट हा दरवर्षी "जागतिक आदिवासी दिन" म्हणून साजरा केला जातो. आदिवासी समाज भारताखेरीज जगातील अन्य देशातही आढळून येतो. इसवी सन १९६२ साली शिलाँग मध्ये आदिवासी समितीच्या परिषदेने आदिवासींची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे.

"एका समान भाषेचा वापर करणाऱ्या, एकाच पूर्वजांपासून उत्पत्ती सांगणाऱ्या, एका विशिष्ट भूप्रदेशात वास्तव्य करणाऱ्या, तंत्रशास्त्रीय ज्ञानाच्या दृष्टीने मागासलेल्या, अक्षर ओळख नसलेल्या व रक्त संबंधावर आधारित सामाजिक व राजकीय रीतीरिवाज यांचे प्रामाणिक पालन करणाऱ्या एकजिनसी गटाला आदिवासी समाज म्हणतात".

भारतात आदिवासी जमाती जवळपास तीनशेच्या आसपास आहेत. आदिवासी हा भारतीय समाजातील मूळनिवासी समूह आहे; म्हणूनच तो या देशाचा धरतीपुत्र म्हणून ओळखला जातो. हजारो

वर्षापासून आदिवासी समुदाय जल, जमीन आणि जंगल यांच्या उदराशी आपले दैनंदिन जीवन जगत आलेला आहे. निसर्ग हाच आपला दाता आहे; भगवान आहे, अशी आदिवासींची धारणा आहे. दऱ्याखोऱ्यात राहणारा हा समूह आपली भाषा आणि संस्कृती जतन करत आपल्या पिढ्यानपिढ्या पुढे संक्रमित करत मार्गक्रमण करीत आहे.

महाराष्ट्रात आदिवासी जमातीच्या एकूण ४५ मुख्य जमाती आढळून येतात. त्यापैकी गोंड, परधान, कोरकू, कोकणी, पावरा, नागा भिल्ल, वारली आणि आंध इत्यादी जमाती प्रामुख्याने आढळून येतात. आदिवासी आंध ही जमात महाराष्ट्रात मराठवाडा आणि विदर्भ तसेच आंध्रप्रदेश मधीलआदिलाबाद, निर्मल या जिल्ह्यात आहे. मराठवाड्यात नांदेड, हिंगोली, परभणी या जिल्ह्यात भरपूर प्रमाणात आदिवासी आंध जमातीचे वास्तव्य आहे. आंध जमातीत मौखिक साहित्य अधिक प्रमाणात आहे, हेही पहावयास मिळते. लोकसाहित्याची अनेक अंगे पहावयास मिळतात. जसे की लोककथा, लोकगीते, लोककला, नाट्यकला इत्यादी साहित्याचे दर्शन आदिवासी आंध जमातीत होत असते.

परंतु अतिशय खेदाने सांगावयाचे झाल्यास आदिवासी आंध जमातीचे कोणतेही साहित्य असो यावर म्हणावे तेवढे लिखाण अद्याप झालेले दिसत नाही. त्यामुळे या जमातीची दशा आणि दिशा पुढेआलेली नाही. म्हणूनच आंध जमातीचा शैक्षणिक, सामाजिक, राजकीय आणि साहित्यिक विकासच झाला नाही, हे आंधाचे दुर्दैव म्हणावे लागेल. आंध जमातीचे सुखदुःख, त्यांच्या भावना, परंपरांचे हुबेहूब दर्शन त्यांच्या व्यक्त होणाऱ्या भावनेतून प्रत्ययास येते. त्यांच्या ओठावर उठलेले शब्दांचे मोती आणि त्यामुळे त्यांची गुंफलेली सुरेख माळ म्हणजे आदिवासींची "लोकगीते" लोकवाङ्मय होत.

लोकगीते हा कोणत्याही साहित्याचा आत्म असतो, म्हणूनच मी आंध आदिवासींचा दडलेला, दाबून ठेवलेला आत्मा जागृत करण्यासाठी 'मराठवाड्यातील आदिवासी आंध जमातीच्या लोकगीतातील समाजदर्शन एक विवेचक अभ्यास" हा विषय प्रबंधासाठी घेतलेला आहे.

आजही मराठवाड्यातील आदिवासी जमात दऱ्याखोऱ्यात, रानावनात आणि डोंगराच्या कड्याकपाऱ्यात राहते. आंध संस्कृती ही अतिप्राचीन संस्कृती मानली जाते. राजा 'सातवाहन' सारखे वीर आणि पराक्रमी राजे या जमातीत होऊन गेले. इतर जाती-धर्माच्या तुलनेत आणि त्यांच्या चालीरिती, रूढी आणि परंपरा त्यांचे राहणीमान अतिशय विभिन्न पहावयास मिळते. आता कुठे या समूहाला फुले-शाहू- आंबेडकर यांच्या प्रेरणेने आणि शिक्षणाच्या प्रसारामुळे नवे आत्मभान येत आहे.

2) विषय निवडण्यामागील भुमिका:-

आंध ही एक दऱ्याखोऱ्यातील जमात. दऱ्या खोऱ्यातून वाहणाऱ्या वाऱ्यांचा मंजुळ ध्वनी आणि त्या मंजुळ मनमोहक ध्वनीला साथ मिळते ती माझ्या मातृ-पितृच्या स्वरांची. आदिवासी

समूहाच्या सामाजिक, भावनिक आणि ऐतिहासिक कार्याचा उल्लेख मांडण्यासाठी सदरील शोधप्रबंधाची निवड केली आहे. 'मराठवाड्यातील आदिवासी आंध जमातीच्या लोकगीतातील समाजदर्शन एक विवेचक अभ्यास" हा विषय निवडण्यामागील कारण असे की, आदिवासी साहित्यातील कविता, कादंबरी, आत्मकथन इत्यादी वाड्मय प्रकारावर अनेकांनी थोडेफार संशोधन केले आहे, परंतु आंध आदिवासी जमातीच्या लोकगीतावर म्हणावे तेवढे संशोधन झालेले दिसत नाही. लोकगीते हा साहित्याचा आत्मा असतो. लोकगीतातूनच त्या जमातीच्या आत्मीयतेचे, भावनिकतेचे आणि संस्कृतीचे दर्शन घडते. म्हणून 'मराठवाड्यातील आदिवासी आंध जमातीच्या लोकगीतातील समाजदर्शन एक विवेचक अभ्यास' या विषयावर आपल्या विद्यापीठात अद्याप संशोधन झालेले नाही. म्हणून संशोधनासाठी हा विषय निवडला आहे.

आंध आदिवासी समुदायातील देवता विषयक ओवीगीते, विवाहगीते, नातेसंबंधांची गीते, विधीगीते, श्रमगीते, कृषीकर्म करतानाची गीते इत्यादी लोकगीतातून आंध लोकांच्या संस्कृतीचा देखावा सखोल अभ्यासातून मांडून तो संशोधन क्षेत्रात आणण्यासाठी सदरील शोध प्रबंध निवडण्यामागची मुख्य भूमिका आहे.

3) संशोधन विषयाचे महत्त्व:-

संशोधन ही निरंतर आणि सातत्यपूर्ण चालणारी प्रक्रिया आहे. संशोधन हे स्वतः स्वयंस्फूर्तीने शोध घेऊन केलेले कार्य आहे. संशोधन हे समाजाला नवी दिशा आणि प्रेरणा देणारे असते. लोकवाङ्मयात लोकप्रथा, लोकविधी, रुढी- परंपरा, आचार-विचार, लोकश्रद्धा, लोककला विशेष करून 'लोकगीते' इत्यादी सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भ आदिंना महत्त्व आहे.

मराठी साहित्याच्या प्रांतात आदिवासी लोकगीताला खरोखरच महत्त्वपूर्ण स्थान आहे का? विशेषत: आंध आदिवासी लोकगीतातील समाजदर्शनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे का? खरोखरच त्यावर सखोल असे संशोधन झाले आहे का? आज पर्यंत जे जे आदिवासी आंध लोकगीतावर संशोधने झालेली आहेत त्या संशोधनात्मक अभ्यासातून आदिवासी जमातीच्या समस्या सुटल्या आहेत का? वरील सर्व प्रश्नांची उत्तरे नकारात्मकच मिळतील, याची मला खात्री आहे. आणि म्हणूनच पुन्हा एकदा नव्याने आंध जमातीच्या लोकगीतावर संशोधन व्हावे यासाठीच हा विषय मला महत्वपूर्ण वाटतो. स्वातंत्र्यानंतर आदिवासींच्या जीवनाचा, त्यांच्या रूढी परंपरेचा संशोधनात्मक अभ्यास तुरळक प्रमाणात झालेला दिसून येतो. अशा प्रकारचे संशोधन ट्रोटक प्रमाणात आढळून येते. आदिवासी संस्कृतीत आदिवासी आंध जमातीची लोकगीते महत्त्वाची आहेत परंतु इतर धर्म संस्कृतीच्या नकळत प्रभावामुळे ही लोकगीते संपुष्टात येतात की काय? अशी भीती वाटू लागली म्हणूनच पुढच्या पिढीला आंध जमातीच्या लोकगीतातील समाजदर्शनाचे संकलन करणे महत्त्वाचे वाटते.

४) संशोधन विषयाचे वेगळेपण:-

आदिवासी आंध जमात ही अतिप्राचीन संस्कृतीचे जतन करत आलेली मुख्य जमात आहे. स्त्रीत्वाला प्रथम प्राधान्य देणारी ही जमात प्रामुख्याने मराठवाड्यातील बऱ्याच जिल्ह्यामध्ये जास्त प्रमाणात आढळून येते. आदिवासी आंध जमातीचे लोक भोळ्या स्वभावाची आणि मनमिळावू वृत्तीची असतात. त्यांच्यात मायेचा झरा आजही पहावयास मिळतो. निसर्गप्रेमी जमात आहे. त्यांच्या ओठावर पडणारे शब्द आणि त्या शब्दांची केलेली गुंफण एक अर्थपूर्ण संदेश देणारी आहे. भावनेला गीताच्या रूपाने दुसऱ्यासमोर प्रस्तावित करण्याची कला त्यांना निसर्गदत्त मिळालेली आहे.

आंध आदिवासींच्या समग्र जीवनाचा अभ्यास ज्या अभ्यासकास अर्थात संशोधकास करावयाचा आहे, त्यांनी या जमातीच्या वाड्या-वस्तीवर, डोंगर-दऱ्यात जाऊन त्या समूहात राहणे गरजेचे आहे. तेव्हा या समूहाच्या खऱ्या वास्तववादी जीवनाचा अर्थ लक्षात येईल.

आदिवासी आंध जमातीच्या लोकगीतातील समाजदर्शन एक विवेचक अभ्यासाचे' अध्ययन करीत असताना प्रत्यक्ष क्षेत्रीय अध्ययन पद्धतीचा वापर करावा लागेल. त्यासाठी प्रत्यक्ष त्यांच्या समवेत राहून त्यांच्या संस्कृतीचे आणि लोकगीतांचे सखोल अध्ययन मला करावयाचे आहे. कारण मी स्वतः त्याच जमातीचा एक अविभाज्य घटक आहे. लोकगीतातून प्रकट होणाऱ्या भावना, संवेदना, निसर्गावरील प्रेम, वेदना इत्यादी या संशोधनाच्या माध्यमातून मला जगापुढे मांडावयाच्या आहेत. आणि हेच माझ्या मुख्य संशोधन विषयाचे खास वेगळेपण आहे.

५) संशोधन विषयाच्या मर्यादा:-

संशोधन ही अविरत आणि सतत चालणारी निरंतर प्रक्रिया आहे. आदिवासी आंध जमातीच्या लोकगीतातील समाजदर्शन या विषयाची नेमकी मांडणी करण्यासाठी, अभ्यास करण्यासाठी या संशोधन विषयाला काही मर्यादा असणे आवश्यक आहे. संशोधन विषयाच्या संदर्भात काही मर्यादा हेतूत: स्वीकारलेल्या आहेत. आदिवासी लोकसाहित्य आणि लोकवाङ्मय हा एवढा व्यापक विषय आहे की; याची व्याप्ती अमर्याद आहे. हा विषय जेवढा लांबविला जातो तेवढा अपुरा पडणारा आहे. म्हणूनच माझ्या सदर संशोधन विषयाला पहिली मर्यादा येथे ती, आदिवासी आंध जमातीच्या केवळ लोकगीतातील समाजदर्शन या विषयाची निवड केली आहे.

दुसरी मर्यादा अशी आहे की, ती 'भूप्रदेशाशी' निगडित आहे. देशाच्या विविध भागात आदिवासिंची विपुल प्रमाणात वस्ती आढळून येते. परंतू मी मराठवाड्यातील काही जिल्ह्यांमध्ये आंध आदिवासीच्या लोकांची वस्ती असल्याकारणाने उपनिर्दिष्ट जिल्ह्यातील नांदेड, हिंगोली, परभणी आणि

जालना याच जिल्ह्यातील आदिवासींच्या लोकगीतातील समाजदर्शन एक विवेचक अभ्यास करणे, हाच माझ्या संशोधनाचा मुख्य भाग आहे.

माझ्या संशोधन विषयाला तिसरी मर्यादा घातली ती 'समूहनिवडिची'. कारण आदिवासी जमातीमध्ये एकूण ४५ मुख्य जमातीचा समावेश आहे. या सर्वच जमातीचा अभ्यास करणे शक्य होणार नाही. म्हणून मी फक्त आदिवासी आंध या एकाच जमातीच्या लोकगीतातील समाजदर्शन या विषयाचा अभ्यास करणे माझ्या संशोधन विषयाची मर्यादा आहे.

६) संशोधन अध्ययनाचे क्षेत्र:-

आदिवासी आंध जमात महाराष्ट्रातील मराठवाडा आणि विदर्भ या दोनच प्रांतात आढळून येणारी ही जमात आहे. परंतु माझ्या प्रबंधाचा आवाका जास्त होऊन संशोधन प्रक्रियेत बाधा निर्माण होऊ नये, म्हणून मराठवाड्यातील आदिवासी आंध जमातीच्या लोकगीतातील समाजदर्शन हे क्षेत्र निवडले आहे. मराठवाड्यातील नांदेड, हिंगोली, परभणी आणि जालना या जिल्ह्यांचा समावेश आहे. या भागात मोठ्या प्रमाणात आंध आदिवासी ही जमात आढळून येते. माझा संशोधनाचा विषय मराठवाड्या पुरताच मर्यादित क्षेत्र म्हणून निवडला गेला आहे.

७) संशोधन अध्ययनाची सामग्री:-

संशोधन ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. संदर्भिय विषयाचे अध्ययन करीत असताना संबंधित विषयाच्या खोलापर्यंत गेल्याशिवाय संशोधन पूर्ण होत नाही. त्यासाठी लागणाऱ्या वेगवेगळ्या साधनसामुग्रीचा शोध घेऊन अभ्यास करणे गरजेचे ठरते. या साधनसामुग्रीचा अभ्यास संशोधनासाठी केल्यास हे संशोधन उत्कृष्ट दर्जाचे होऊ शकते. त्यात मुलाखत, प्रकाशित पुस्तके, नियतकालिके, संदर्भग्रंथ, प्रश्नावली, आदिवासी साहित्य, संशोधन ग्रंथालय या संशोधन सामग्रीचा उपयोग करून संशोधन विषयात अधिक भर पडू शकते. आणि संशोधन हे व्यवस्थित व उत्कृष्ट होऊ शकते. या साधनसामुग्रीचा योग्य उपयोग करून मी माझे संशोधन पूर्ण करणार आहे.

८) संशोधनातील समस्या:-

आंध आदिवासी साहित्यावर आतापर्यंतच्या काळात म्हणावे तेवढे लिखाण झालेली नाही; ही एक मोठी खेदाची बाब आहे. या विषयावर संशोधन करताना मला अनेक समस्यांना सामोरे जावे लागणार आहे. प्रामुख्याने खालील समस्या सांगता येतील.

१) खेड्यातील लोकांच्या कामाचा व्याप.

२) मजुरी-रोजगार यामुळे मनधरणी करावी लागते.

३) लोकगीते मिळविण्यासाठी पुन्हा पुन्हा भेटीस जावे लागेल.

४) काही रात्रीचे विधीगीते असतात, तेंव्हा जागे राहावे लागेल.

५) काही वेळा गीते सांगण्यास नकार देतात.

६) काही लोकांच्या लाजाळू स्वभावामुळे लोकगीते मिळविण्यास अडचण निर्माण होते.

या विषयावर संशोधन करताना मला काही गग्रंथालय दैनिके, मासिके, नियतकालिके, काही संदर्भग्रंथ यांचा आधार घ्यावा लागेल. मला लागणारे साहित्य बऱ्याच प्रकाशकाकडे सुद्धा उपलब्ध नाहीत, त्यासाठी मला अनेक समस्येला सामोरे जावे लागणार आहे ह्याच माझ्या संशोधनातील समस्या आहेत.

९) संशोधनाच्या पद्धती:-

संशोधन पद्धती ही विषय निवडीवर अवलंबून असल्याने त्यावर आधारित संशोधन करणे गरजेचे ठरते.

प्रस्तुत संशोधनाचा अभ्यास हा आदिवासीच्या प्रत्यक्ष जीवनावर आधारलेला आहे. त्यामुळे प्रत्यक्ष क्षेत्र भेट घेऊन संबंधित संशोधनासाठी आवश्यक असणारी माहिती संकलित करणे गरजेचे आहे. त्यासाठी सामाजिक संशोधन पद्धत, प्रश्नावली व मुलाखत आणि ग्रंथ व ग्रंथालयाच्या आधारे हे संशोधन पूर्ण करण्यात येईल.

प्रस्तुत संशोधनाचा अभ्यास हा आदिवासीच्या प्रत्यक्ष जीवनावर आधारलेला आहे. यापैकी मी सामाजिक संशोधन पद्धत, प्रश्नावली व मुलाखत आणि ग्रंथ व ग्रंथालयाच्या आधारे मी माझे संशोधन करणार आहे.

१०) संशोधन अध्ययनाची उद्दिष्टे:-

'मराठवाड्यातील आदिवासी आंध जमातीतील लोकगीतांचे समाजदर्शन एक विवेचक अभ्यास' हा विषय अध्ययनासाठी का निवडला; हे अगदी स्पष्ट नमूद केले आहे. या विषयाचा अभ्यास करावयाचा असेल तर मला काय केले पाहिजे? अशा प्रश्नांची मी आधीच सांगड घालून उद्दिष्टांची निर्मिती केलेली आहे. त्या अनुषंगाने मला आंध जमातीच्या दऱ्याखोऱ्यात राहणाऱ्या लोकांपर्यंत पोहोचता येईल. त्यांची संस्कृती मला जवळून अभ्यासता येईल. अशी माझ्या मनात सुप्त इच्छा होती. म्हणून मी आदिवासी आंध जमातीच्या लोकगीतातील समाजदर्शन अध्ययनाची काही उद्दिष्टे निर्धारित केलेली आहे, ती पुढील प्रमाणे_

१) आंध आदिवासींच्या धार्मिक, सांस्कृतिक, कौटुंबिक, शैक्षणिक तसेच राजकीय आणि आर्थिक संरचना व त्यांच्या जीवनकार्यात होत असलेले बदल स्पष्ट करणे.

२) आंध आदिवासींचे खरेखुरे दैनंदिन जीवन अभ्यासणे.

३) डोंगरदऱ्यात आदिवासी आंध समूहात राहणाऱ्या स्त्री-पुरुषांच्या लोकगीतातील समाजदर्शनाचा अभ्यास करणे.

४) आंध आदिवासींच्या लोकगीतातील समाजदर्शन अभ्यासणे.

५) विविध सण, उत्सव, लग्न समारंभ, सामाजिक तसेच धार्मिक स्वरूपांच्या लोकगीतांचा अभ्यास करणे.

६) लोकगीताच्या माध्यमातून आंध समूहाच्या समाज दर्शनाचे गाभाघटक, त्यातील मथितार्थ आणि लोप पावत चाललेली आंध जमातीची संस्कृती जगासमोर मांडण्याचा प्रयत्न करणे.

-: संशोधन विषयाच्या अभ्यासाची मांडणी :-

हजारो वर्षापासून ते आतापर्यंत माणसाने मानवी स्वभावाची देवाण-घेवाण करून समूहाच्या ऐहिक जीवनाशी असलेले नाते लोकगीताने दृढ केलेले आहेत. त्याला एका माळीत गुंफण्याचे काम आदिवासी लोकगीतांनी केले आहे. 'मराठवाड्यातील आदिवासी आंध जमातीच्या लोकगीतातील समाजदर्शन' या विषयाचा अभ्यास करीत असताना विषयाच्या अभ्यासाची मांडणी पुढील प्रमाणे केली आहे.

-:महाराष्ट्रातील आदिवासी समाज:-

भारतात आदिवासी समाज सर्व राज्यामध्ये राहतो. ज्या समाजाची संस्कृती राहणीमान इतर समाजापेक्षा वेगळी आहे, त्याला अनुसूचित जमाती या नावाने ओळखतात. भारतात एकूण ४६१ अनुसूचित जमाती आढळून येतात. महाराषमहाराष्ट्रामध्ये आदिवासींच्या एकूण ४५ जमाती आहेत.

महाराष्ट्रामध्ये प्रामुख्याने आंध, गोंड, परधान, कोलाम, वारली, कातकरी पारधी, माडिया गोंड इत्यादी जमातींना मुख्य जमाती म्हणून केंद्र शासनाने सुचित केलेले आहे. महाराष्ट्रात सध्या ४५ आदिवासी जमातीचा उल्लेख करण्यात येतो. भारतीय संविधानात आदिवासींना कलम ३४२ (१) नुसार अनुसूचित जमाती या नावाने ओळख आहे.

-: आंध आदिवासी जमातीची ऐतिहासिक पार्श्वभूमी :-

आदिवासी आंध जमाती निसर्गाशी जोडलेली जमात आहे. आदिवासींच्या प्रमुख जमातीमध्ये आदिवासी आंध जमातीचा उल्लेख केला जातो.

प्रकरण पहिले :-

१) आंधाच्या लोकगीतातील समाज जीवन:-

प्रस्तुत प्रकरणात आंधाचे कौटुंबिक जीवन, त्यांच्या घराची रचना, वेशभूषा, दागदागिने, सण-उत्सव, उद्योगधंदे, वृत्त-वैकल्य, श्रद्धा-अंधश्रद्धा आणि त्यांच्या विविध कला यांची मांडणी केलेली आहे. त्यांची शैक्षणिक स्थिती बोलीभाषा, देवभोळेपणा, पारंपरिक लोकगीते, विवाह व विधीप्रथा कोणत्या स्वरूपाची आहे याचा उल्लेख केलेला आहे. त्याचप्रमाणे आहार, मुख्यअन्न, दारुला जीवनात आलेले अनन्यसाधारण महत्त्व हे आणि असे अनेक प्रश्न समोर ठेवून संशोधन विषयाची मांडणी केली जाईल.

प्रकरण दुसरे:-

२) आंधाच्या लोकगीतातून चित्रीत झालेले सांस्कृतिक जीवन :-

नागर संस्कृती पासून दूर राहणारा आणि वेगळे जीवन जगणारा लोकसमूह म्हणजे आदिवासी आंध समाज होय. आदिवासी आंधाच्या चालीरिती, परंपरा, रुढी, सण-उत्सव, पोशाख, भाषा, विधी मृत्यू हे सर्व नागर संस्कृतीमध्ये जीवन जगणाऱ्या लोकांपेक्षा वेगळे आहे. म्हणूनच आदिवासींची विविध भावरंगांनी सजलेली मोहक अशी संस्कृती आहे. नागर संस्कृती पेक्षा आंध जमातींची संस्कृती वेगळी आहे हे दाखवण्याचा प्रयत्न या घटकातून करण्यात येईल.

प्रकरण तिसरे:-

३) आंधाच्या लोकगीतातील कृषिसंस्कृतीचे दर्शन :-

पारंपरिक जीवन पद्धतीत घरकामाचा व शेतातील कामाचा बराच मोठा वाटा आंध समूहाच्या स्त्रिया उचलत असतात. दैनंदिन जीवनातील बरीच कामे ही शारीरिक मेहनतीची असतात; त्यामुळे शारीरिक थकवा कमी व्हावा आणि शेतातील कामाला वेग यावा यासाठी आंध आदिवासी

कृषिकर्म करीत असताना गाणे गात असतात. वेगवेगळ्या ऋतूमध्ये मग तो कोणताही हंगाम असो खरीप असो वा रब्बी हंगाम; त्याला अनुसरून गीताची रचना केलेली असते. त्याचाच शोध घेऊन मी माझे संशोधन पूर्ण करण्याचा निर्णय घेतला आहे. यातून आंध जमातीचे कृषिविषयक प्रेम आणि भावना यांचा शोध घेऊन या प्रकरणात मांडण्याचा प्रयत्न करणार आहे.

प्रकरण चौथे:-

४) आंधाच्या लोकगीतातील धार्मिक जीवन :-

आदिवासी धर्म संकल्पनेसंबंधी विवेचन करताना त्यांच्या संस्कृतीचा उल्लेख करणे अपरिहार्य ठरते. इतर धर्मातील लोकांचे सांस्कृतिक जीवन आणि आदिवासी जणसमुदायाच्या लोकांचे संस्कृतीक जीवन यात खूपच वेगळेपणा दिसून येतो. आदिवासी आंध जमात ही निसर्गाच्या कवेत अधिवास करणारी जमात आहे. आंध जमातीचे धार्मिक जीवन त्यांच्या लोकगीतातून दिसून येते. या प्रकरणात देवदेवता विषयक लोकगीते, सण व उत्सव प्रसंगी गायलेली लोकगीते, यात नागपंचमी, श्रियाळगीते त्याचबरोबर विधीगीते यात लग्नविधी, जन्म, पाचवी व नाव ठेवण्याचा विधी, मृत्यूविधी, धोंडीचाविधी, घटाचाविधी, गडचांद्याची आई अशा वेगवेगळ्या लोकगीताचा समावेश या प्रकरणात मांडण्याचा प्रयत्न करणार आहे.

प्रकरण पाचवे:-

५) आंधाच्या लोकगीतांचे विशेष :-

मराठवाड्यातील आदिवासी आंध जमात नांदेड, हिंगोली, परभणी व जालना या जिल्हयात आढळते. इतर आदिवासी जमातीच्या मानाने आंध जमातीची लोकसंख्या मराठवाडा विभागात तशी खूप आहे. या जमातीची स्वतंत्र बोली कालांतराने संपुष्टात आलेली दिसून येते. आंध जमातीचे लोक सभोवतालच्या लोकांप्रमाणे मराठीची बोली बोलताना दिसून येतात. त्यामुळे आंध लोकांच्या लोकगीतांची भाषा सुद्धा मराठीच आहे. असे निदर्शनास येते. मराठवाड्यातील आंधाची लोकगीते ही पारंपारिक असून, त्याचा करता अनामिक असतो. आणि ती गीते लोक जीवनामधूनच साकारलेली असतात. म्हणून आंधाच्या लोकगीतातील लोकजीवन जिवंत वाटते. मराठवाड्यातील आंध जमातीच्या लोकगीतांचे वर्गीकरण करावयाचे झाल्यास स्त्रियांची गीते, पुरुषांची गीते, लहान मुलांची गाणी, इत्यादी येतात. यात उपविभाग पडलेले आहेत.

संदर्भसूची :-

१) प्रा. डॉ. राजेश धनजकर आदिवासी आंधाची लोकगीते साधना पब्लिकेशन्स- परभणी.

२) डॉ. रा.गो. चौरे आंध जमात: लोकसाहित्य आणि संस्कृती शब्दवैभव प्रकाशन- शॉप २१५ न. महालक्ष्मी मेट्रो स्क्वेअर जोगेश्वरी लेन बुधवार पेठ- पुणे ४१०००२ प्रथम आवृत्ती २० फेब्रुवारी २००६.

३) प्रा. डॉ. राजेश धनजकर आंध जमात: शोध आणि बोध अनुराधा पब्लिकेशन, नांदेड प्रथम आवृत्ती ५ ऑगस्ट २०१२.

४) विश्वनाथ धुमाळे आंध आदिवासी जमात: इतिहास व सांस्कृतिक वारसा सुवर्ण प्रकाशन- १५४ पब्लिक ३ पोकळे बिल्डिंग दुसरा मजला, शेवटचा बस स्टॉप धायरी गाव, पुणे- ४१ आवृत्ती १५ नोव्हेंबर २०१६

५) प्रा. डॉ. राजेश धनजकर मराठवाड्यातील आंध जमातीचे लोक साहित्य', अनुराधा पब्लिकेशन्स-

६) डॉ. अलका हिवाळे 'आदिवासी लोकगीतातील स्त्री-जीवन' कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद- प्रथमावृत्ती २००२.